दिनांक 14/10/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र. 131

विषय – सन 2024-2025 या वित्तीय वर्षाकरीता नगपरिषदेकडील वाहन विभागाकडील अग्निशामक, मोठा पाणी टँकर , लाहन पाणी टँकर, व्हॉक्युरम पंप, शववाहीका, गारबेज, घंटागाडया, टॅक्टर, जेटटर, एच टी पी, बोलोरो जीप इत्यादी वाहने दुरूस्ती करणेकामी दाखल ई निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुखयांची दिनांक 14/10/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

सन 2024-2025 या वित्तीय वर्षाकरीता नगपरिषदेकडील वाहन विभागाकडील अग्निशामक, मोठा पाणी टँकर , लाहन पाणी टँकर, व्हॉक्युरम पंप, शववाहीका, गारबेज, घंटागाडया, टॅक्टर, जेटटर, एच टी पी, बोलोरो जीप इत्यादी वाहने दुरूस्ती करणेकामी खालील ई निविदा दाखल आहेत.

| | नगरपरिषदेकडील सर्व वाहनांची दुरूस्ती |
|---|---|
| 1) कॉन्ट्रीप्रो इंडस्ट्रीज, भोसरी पुणे | र.रू.9,78,987/- सर्व करासहित |
| 2) सागर इलेक्ट्रो सिस्टीम, पुणे | र.रू.9,93,654/- सर्व करासहित |
| 3) टेक्नो प्रोजेक्ट इंडस्ट्रीज, सांगली | र.रू.9,97,100/- सर्व करासहित |

उपरोक्त ई निविदापैकी कॉन्ट्रीप्रो इंडस्ट्रीज, भोसरी पुणे यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक 14/10/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.132

विषय – सन 2024-2025 या वित्तीय वर्षाकरीता नगरपरिषद कामांसाठी चार चाकी वाहन भाडयाने पुरवठा करणेकामी दाखल ई निविदावर निर्णय घेणे.

संदर्भ- मा.मुख्याधिकारी यांनी विभाग प्रमुख यांची दिनांक 14/10/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

सन 2024-2025 या वित्तीय वर्षाकरीता नगरपरिषद कामांसाठी चार चाकी वाहन भाडयाने पुरवठा करणेकामी खालील ई निविदा दाखल आहेत.

1) सरस्वती बहुउदेशिय संस्था, विटा — प्रति कि.मी. 47.20/- सर्व करासहित
2) कुलदिप कुंडलीक भिंगारदेवे ,विटा — प्रति कि.मी. 31.86/- सर्व करासहित
3) आयुब डी.तांबोळी — प्रति कि.मी. 25.96/- सर्व करासहित

उपरोक्त ई निविदापैकी आयुब डी.तांबोळी यांचे निविदेतील दर सर्वात कमी आहेत. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता 2013 मधील तरतूदीनूसार सर्वात कमी दराची निविदा मंजूर करीत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा

दिनांक - 14 /10/2024 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.133

विषय - विटा नगरपरिषद आरोग्य विभागाकडे दैनंदिन कचरा संकलन कामी लिटर पीकर वाहने मा.जिल्हाधिकारी सांगली यांचेकडे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजने अंतर्गत खरेदी करणेकामी प्रशासकीय मान्यता व निधी मंजुरीस्तव प्रस्ताव पाठविणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ – 1) मा.मुख्याधिकारी यांनी वाहन विभाग प्रमुख यांची दिनांक - 14/10/2024 रोजी मंजूर केलेली टिपणी.

2) मा.प्र.जिल्हा सह आयुक्त, नगरपरिषद प्रशासन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय सांगली

यांचे पत्र क्र. नवि/कार्या-5/कावि-359/2024, दि.19/07/2024.

3) साई फायबर्स सांगली यांचे पत्र आवक क्र. 1954,दि.28/06/2024.

विटा नगर परिषद ही "ब" वर्ग नगर परिषद असून शहराची लोकसंख्या 2011 च्या जनगणनेनुसार 48,289 आहे. सध्याची लोकसंख्या अंदाजे 60,000 आहे. शहरात अंदाजे एकूण 18,000 मिळकती आहेत. विटा नगर परिषदेने स्वच्छ सर्वेक्षण 2021 मध्ये 50 हजारांपेक्षा कमी लोकसंख्या असणाऱ्या शहरांच्या गटात देशात पहिला क्रमांक पटकावला आहे. सध्या नगरपरिषदेकडे 19 घंटागाड्या व 2 ट्रॅक्टर आहेत. सदर गाड्यांद्वारे शहरातील एकूण 38 रूट मधून दर दिवशी सरासरी एकूण 22 टन एवढा कचरा संकलित केला जातो. सदर कचरा घनकचरा व्यवस्थापन केंद्र (शहरापासून 5 किमी दूर) येथे वाहतूक करून नेला जातो. सदर सर्व कचऱ्यावर घनकचरा व्यवस्थापन केंद्र येथे प्रक्रिया केली जाते.

विटा शहराचे क्षेत्रफळ 55.15 चौ.कि.मी. असून शहर हद्दीत अंदाजे 125 कि.मी. लांबीचे रस्ते, 118 कि.मी. लांबीची गटर, 18 सार्वजनिक शौचालये आहेत. सदर सार्वजनिक व सामुदायिक शौचालये, मुता-या तसेच गटर व रस्ते यांची दैनंदिन साफसफाई केली जाते.

नगरपरिषदेच्या आरोग्य विभागाकडे रस्त्यावर पडणारा दैनंदिन कचरा, नगरपरिषदेच्या क्षेत्रात वेगवेगळया ठिकाणी भरणाऱ्या आठवडा बाजारामधुन पडणारा कचरा, रस्त्याच्या बाजुचे फुटपाथ, दुभाजक, रोड साईडचा कचरा व अरुंद गल्ली बोळातील रस्त्यावर पडणारा कचरा दैनंदिन उठाव करण्यासाठी, झाडलोट करण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ व स्वतंत्र वाहनाची व्यवस्था नगरपरिषदेकडे नाही. त्यामुळे उपलब्ध मनुष्यबळ व वाहनांचा वापर करुन संपूर्ण कचरा उठाव करणे अडचणीचे होत आहे. काही ठिकाणी रस्त्यावर पडणारा कचरा नजरेस येवुन शहराच्या सौंदर्यास बाधा येत आहे व नागरीकांच्या कचरा उठाव तक्रारींना सामोरे जावे लागत आहे. या सर्व बाबींचा विचार करुन छोट्या आकाराच्या हेवी व्हॅक्युम प्रणाली वापरुन कचरा सक्शन करणारी व्हेईकल माऊंटेड मशीन खरेदी करणे आवश्यक वाटते. ज्यामुळे जलद व कमी मनुष्यबळ वापरुन स्वच्छता करता येणार आहे.

पान नं.2 वर

संदर्भ क्र. 2 नुसार नगरपरिषद क्षेत्रात निर्माण होणारा कचरा दैनंदिन उठाव करण्यासाठी वरील प्रमाणे आधुनिक तंत्रज्ञानाने युक्त कचरा संकलन वाहने खेरदीसाठी प्रस्ताव सादर करणेबाबत मा.कामगार मंत्री तथा पालकमंत्री महोदय, सांगली जिल्हा यांनी सुचित केले आहे.

नगरपरिषदेच्या कार्यक्षेत्राचा विचार करता डिझेल इंजिन ऑपरेटेड टाटा ईन्द्रा/ अशोक लेलैंड दोस्त किंवा इतर वाहनावर ओला व सुका कचरा सक्शन करणारे मशीन (लिटर पीकर) आवश्यक आहे. अशा प्रकारच्या मशीनचे उत्पादन करणाऱ्या कंपन्या व GeM पोर्टलवर उपलब्ध मशीनचे दरपत्रक घेऊन खालीलप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

| अ.क्र. | वाहन प्रकार | दर | नग | एकूण र.रु. |
|---|---|---|---|---|
| 1 | डिझेल इंजिन ऑपरेटेड व्हेईकल माऊंटेड ड्राय अॅन्ड वेट गार्बेज सक्शन मशीन (लिटर पीकर) | 55,62,000/- | 2 | 1,11,24,000/- |
| अक्षरी - एक कोटी अकरा लाख चोवीस हजार रुपये फक्त. | | | | |

तरी वरीलप्रमाणे विटा नगरपरिषद आरोग्य विभागाकडे दैनंदिन कचरा संकलन कामी 2 नग लिटर पीकर वाहन खरेदी कामी येणाऱ्या अंदाजे र.रु.1,11,24,000/- मात्र चा प्रस्ताव महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर) योजने अंतर्गत मंजुरीसाठी मा.जिल्हाधिकारी सांगली यांचेकडे सादर करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( डॉ.विक्रम बांदल )
प्रशासक
विटा नगरपरिषद विटा